MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



आरक्षणाचे जनक बहुजन उद्धारक लोकराजे छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना भीमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भीमराव सरवदे साहेब सुमित आवाडे लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश भाऊ वाहुळे अशोक भाऊ काळे विशाल भैया शेवाळे आदित्य भैया चौरे अकबर शेख शिवसेना(णइढ) शहर उपाध्यक्ष पप्पू भैया अपेट

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०१ अंक –२७३ बुधवार दि.२६ जुन २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -273 WEDNESDAY DT. 26 JUNE 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# अबब.. गेवराईत वाळू माफियांची मुजोरी वाढली!

## गेवराईत बेकायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांचा महसूल पथकावर हल्ला



**गेवराई– बायपासवर महसूल पथकाने पकडलेला वाळुने भरलेला हायवा माफियांनी पळवला?**

**वाळू माफियांनी पळवलेला हायवा तो बीडच्या एका बड्या नेत्याचा असल्याची चर्चा?**
**वाळू माफिया विरोधात डीवायएसपी राजगुरू यांची हाताची घडी अन् तोंडावर बोट अशी भूमिका!**





गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातून जाणाऱ्या गोदावरी नदीपात्रातून दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत आहे. सर्रासपणे नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून त्याची वाहतूक केली जात आहे. या अनुषंगाने गेवराई तहसील चे तहसीलदार संदीप खोमणे व मंडळ अधिकारी जितेंद्र लेंडाळ, परमेश्वर काळे, तलाठी सचिन खेत्रे, अजिंक्य शेख, माणिक पांढरे, व त्यांचे शासकीय वाहन चालक शकिल गाजी हे अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी त्यांच्या शासकीय वाहनातून एम.एच–२३–बीएच–०२५७ या वाहानाने गस्तीवर असताना रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान गेवराई बायपास वरून बेकायदेशीर चोरीटी वाळूने भरलेला बिना नंबरचा हायवा भरधाव वेगाने राक्षसभुवन फाट्याकडून बीडच्या दिशेने जात असताना, त्याचा पाठलाग करून अडविला होता. मात्र वाळू माफियांनी तो हायवा तेथून पळविला होता.

त्यानंतर रात्री दोन वाजता अवैध वाळू वाहतूक हायवा पकडल्याचा राग मनात धरून चक्क वाळू माफियांनी या महसूल पथकावर हल्ला करत त्यांच्या शासकीय गाडीची तोडफोड केली आहे. ही घटना दि. २५ जून च्या मध्यरात्री गेवराई–बायपासवर पांढरवाडी रस्त्यावरील हायवे ब्रीज जवळ घडली आहे.

तहसीलदार संदीप खोमणे यांच्यासह मंडळ अधिकारी, तलाठी हे महसूल पथक अवैध वाळू उपसा करून त्याची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईसाठी गस्तीवर होते. गेवराई–बायपास वरून बीडच्या दिशेने बेकायदेशीर रित्या वाळू भरून बिना नंबरचा हायवा भर वेगात जात होता. तो बिना नंबरचा हायवा पकडून तसेच पकडलेला हायवा घेऊन जात असताना, वाळू माफियांनी विरोध करून पकडलेला बिना नंबरचा हायवा तेथून पळविला, पाडळशिंगी टोलनाक्यावर थांबण्याचा प्रयत्न केला मात्र टोलनाक्याच्या बॅरिकेटस तोडून अवैध वाळूने भरलेला हायवा बीडच्या दिशेने पळून गेला. त्यानंतर हा राग मनात धरून वाळू माफियांनी तहसीलदार संदीप खोमणे यांच्यासह त्यांच्या पथकावर हल्ला केला आहे. तसेच लोखंडी रॉडने व लाकडी दांड्याने महसूलच्या शासकीय गाडीच्या काचेवर मारून काचा फोडून वाळू माफियांनी नुकसान केले आहे. हे हल्लेखोर काळ्या रंगाच्या स्कार्पिओ मध्ये आले होते. तसेच तो हायवा बीडच्या एका बड्या नेत्याचा असल्याची माहिती असून याप्रकरणी तहसीलदार संदीप खोमणे यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

गेवराई तालुक्यात वाळू माफियांची दहशत दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. त्यांची एवढी हिंमत वाढली आहे की ते सरकारी अधिकाऱ्यांना जीवे मारण्यासही मागेपुढे पाहात नाही. त्यांना कायद्याचा कोणताही धाक राहीलेला नाही. मग वाळू माफियांना कुणाची साथ आहे? वाळू माफियांचा पोलीस पथकांवर हल्ला, महसूल पथकावर हल्ला, न्यायाधीश यांच्या गाडीला कट मारणे, अशा घटना यापूर्वीसुध्दा घडलेल्या असून, प्रभावी कार्यवाहीचे अभावी वाळूमाफीयांची हिम्मंत दिवंसेदिवस वाढत आहे. एवढी हिंमत वाळू माफियांची कुणाच्या जीवावर वाढली आहे. असे नागरिकांतून दबक्या आवाजात बोलले जात आहे. मात्र वाळू माफिया विरोधात गेवराई चे डीवायएसपी नीरज राजगुरू यांची हाताची घडी तोंडावर बोट अशी भूमिका दिसून येत आहे. वाळू माफियांनी प्रशासनातील एखाद्या अधिकारी, कर्मचारी यांचा जीव गेल्यावर गेवराई च्या डीवायएसपी राजगुरूंना जाग येणार आहे का? तसेच वाळू माफियांसोबत डीवायएसपी नीरज राजगुरू यांचे कनेक्शन काय आहे. व त्यांचे कॉल डिटेल्स वरिष्ठांनी चेक करावे, अशी मागणी केली जात आहे.

गेवराई तालुक्यात यापूर्वी अनेक ठिकाणी वाळू माफियांकडून कारवाईसाठी आलेल्या अधिकाऱ्यांवर हल्ला केलेल्या घटना घडल्या आहेत. परंतु वाळू माफियांना आळा घालण्यासाठी गेवराईचे पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन हे अपयश ठरत असल्याचे दिसून येत आहे. वाळू माफिया विरोधात दंडात्मक व कठोर कारवाई करण्याची कोणाचीही हिंमत होत नसल्याचे नागरिकांकडून चर्चा सुरू आहे. जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब, एक पथक पुन्हा स्थापन करून अवैध वाळू रोखण्यासाठी पथक गेवराई तालुक्यातील नदीपात्रात पाठवा अशी गोदाकाठच्या परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.



# सामाजिक उपक्रम राबवून लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांची जयंती साजरी करणार:- ज्ञानेश्वर चौधरी

कडा । राजू म्हस्के

महाराष्ट्राच्या राजकारणात कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना अत्यंत सामान्य घरातून आलेल्या बहूजननायक लोकनेते स्व.विनायक मेटे यांनी राज्याच्या राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.त्यांनी आयुष्यभर गरजवंत मराठा, धनगर,मुस्लिम आरक्षणाच्या चळवळीत कायम पुढे आणि आक्रमक असलेल्या स्व. विनायक मेटे यांनी आपल्या जीवनात सतत सामाजिक बांधिलकी जपत सामुदायिक विवाह,नशाबंदी,व्यसनमुक्ती,



अजित बालिका (मुलीचा जन्मदर), तसेच स्वच्छता मोहीम,पर्यावरण संरक्षण करण्यासाठी वृक्षरोपन,रक्तदान शिबिर,सुप्रसिद्ध डॉक्टरांच्या निगराणी खाली सर्वरोग निदान शिबिर या सारख्या सामाजिक कामातही सदैव पुढाकार घेतला. स्व.मेटे साहेबांनी राज्याच्या राजकारणात आणि समाजकारणात साधारणपणे सतत ३५ वर्षे आपला कार्यकतृत्वाचा ठसा उमटून आपले वेगळेपण सिद्ध केले मराठा आरक्षण,अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या स्मारकासाठी आंदोलन रस्त्यावर व विधीमंडळात कायम लाऊन धरले वेळप्रसंगी विधिमंडळ बंद पाडले यासह मुस्लिम,धनगर आरक्षणाच्या बाबतीतही त्यांनी पुढाकार घेतला.ईडब्ल्यूएस, स्पर्धा परीक्षेतील मराठा तरुणांच्या वयाचा मुद्दा यासाठी विनायक मेटे यांनी गल्ली ते दिल्ली आवाज उठवला.परंतु दुर्दैवाने मराठा आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयोजित केलेल्या बैठकीला जातानाच अपघातात निधन झाले. येत्या ३० जुन रोजी त्यांची जयंती साजरी होत आहे. लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांनी घालून दिलेला वसा आणि वारसा पुढे चालविण्याचे काम डॉ.ज्योतीताई मेटे करीत आहेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते स्व. विनायक मेटे साहेबांच्या जयंतीनिमित्त आष्टी तालुका शिवसंग्रामच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार असल्याचे सांगितले आहेत. याचाच भाग म्हणून जागर स्मृतीचा अभियान हाती घेतले व जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी करावी जेणेकरून गोरगरीब उंचीत उपेक्षितांना त्यातून लाभ मिळावा. समाजातील वंचित घटकांना आधार मिळावा हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून कार्यकर्त्यांना ते नेहमी प्रोत्साहन देत असत आज मेटे साहेब आपल्यामध्ये नाहीत परंतु त्यांचा सामाजिक व वैचारिक वसा वारसा शिवसंग्रामचे शिलेदार पुढे चालवतील असा विश्वास शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी व्यक्त केला.



आज छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने अभिवादन करण्यात आले यावेळी भा.बौ.महासभेचे बीड जिल्हा कोषाध्यक्ष अमरसिंह ढाका,वंचित चे नेते बबनराव वडमारे,बसपा नेते प्रशांत वासनिक,बीड तालुकाध्यक्ष यशवंत कदम,सरचिटणीस संदेश डोळस, शहराध्यक्ष ड.केतन गायकवाड, सरचिटणीस संतोष जोगदंड, कोषाध्यक्ष दिपक कांबळे, अमोल वडमारे,अजय बाळशंकर, सुयोग ओव्हाळ,देविदास राऊत सर,चक्रे सर,वानखेडे दादा, बोराडे साहेब, अर्जुन जवंजाळ साहेब,काशिनाथ वाघमारे, भास्करजी सरपते, सरपते ताई, मस्के ताई, वासनिक ताई, ॲड. तेजेस वडमारे, ॲड. सदानंद वाघमारे, आयु. सिध्दांत वडमारे आयु, आयु. नितीन प्रधान, आयु. नितीन मुजमुले, आयु. गौतम कांबळे, आयु. संजय सिरसट, आयु. रोहन ससाणे, आयु. उमेश डोळस, आयु. किशोर वडमारे आयु, गणेश शिंदे, आयु. सचिन पवार, आयु. राजेश मस्के आयु. राहुल जावळे, आयु. गौतम खेमाडे, आयु, गौतम सोनवणे, आयु. जितु धन्वे, आयु. महादेव शिंदे समता सैनिक आदी उपस्थित होते.

# आदित्य कृषि महाविद्यालयाच्या कृषिदुतांनी दहिफळ येथे आधुनिक शीतगृहाबद्दल मार्गदर्शन दिले

बीड । प्रतिनिधी

दहिफळ येथे वसंतराव नाईक मराठवडा कृषि विद्यापीठांतर्गत आदित्य शिक्षण संस्थेच्या, जि. बीड येथील आदित्य कृषि महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थी कृषिदूत अभिषेक गरड, गौरव तारळकर, संघर्ष शिंदे ,ओम शेंडे ,अनिकेत पिसोळे, विवेक झगडे, किरण चौडिये, शुभम सलगर यांनी आधुनिक शीत गृहाबद्दल शेतकऱ्यांना ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत शून्य ऊर्जेवर आधारित शीत कक्ष बनवण्याची पद्धत व फायदे शेतकऱ्यांना सांगितले, आणि शीत कक्ष का व कशासाठी बनवायचे याची देखील माहिती सांगितली. शीत कक्ष बांधायला सोपा व कमी खर्च असल्याने शेतकरी आपल्या शेतात ते बांधू शकतात, व थोड्या दिवसांसाठी फळे, भाजीपाला बाजारात विक्रीसाठी नेण्यापूर्वी त्यामधे




साठवू शकतात. बाहेरील तापमानापेक्षा शीत कक्षामध्ये १० डिग्री सेल्सिअस इतके कमी तापमान असते व ९५ डिग्री सेल्सिअस आद्रता असते. त्यामुळे उष्ण ऋतूत याचा उपयोग होतो. तसेच या अभ्यासा दरम्यान विद्यार्थि यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुकाराम तांबे सर,श्याम भुतडा सर, प्राचार्य सानप सर, तसेच ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप मोरे सर, कार्यक्रम अधिकारी वैभव शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिदुतांनी आधुनिक शीत गृहाबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी गावातील सरपंच देविदास राऊत ,उपसरपंच रामेश्वर काळे, तसेच सदस्य लकुळ कदम, चंद्रकांत कदम आणि शेतकरी बांधव उपस्थित होते.

# मा.आमदार संगीता ठोंबरे यांना पडु लागले आमदारकीचे स्वप्न !

केज/ प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक होताच केज विधानसभा मतदारसंघाच्या मा.आ. संगीता ठोंबरे सक्रीय झाल्या असून, मतदारसंघात त्यांनी संपर्क दौरे सुरू केले आहेत व त्यांना आमदारकीचे स्वप्न पडु लागले आहे का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.यावरून ते विधानसभा लढवणार असल्याची चर्चा सुरू झाली. त्या विधानसभेच्या मैदानात उतरल्यातर केजची निवडणूक चुरशीची होऊ शकते अशी चर्चा आहे. सन २०१४ विधानसभेच्या निवडणुकीत केज मतदारसंघातून प्रा. संगीता ठोंबरे या भाजपाच्या




तिकीटावर विजयी झाल्या होत्या. तेंव्हा केंद्र आणि राज्यात भाजपाचे सरकार असल्याने त्यांनी मतदारसंघात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला . मतदारसंघातील सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी विकासाचा निधी खेचून आणण्या ऐवजी वेगळच काही तरी केले. तर त्यांनी पाच वर्षांच्या कार्यकाळात मतदारसंघात सामान्य माणसाला लाब ठेवून काम केल्याने त्यामुळे त्यांनी आमदारकीचे स्वप्न पडु नाही पन पडु लागले आहे. तसेच मागील २०१९ च्या निवडणुकीत पक्षाने ऐनवेळी त्यांची उमेदवारी रद्द केली व भ्रष्टाचारी आमदारा नमीता मुंदडा यांना उमेदवारी दिली व त्यांनी तर चक्क केज तालुक्याचा विकास करण्या ऐवजी केज तालुका भकास केला त्यामुळे त्या राजकारणापासून काहीश्या दूर गेल्या आहेत. तब्बल साडेचार वर्ष त्या राजकारणापासून अलिप्त होत्या. परंतु नुकतीच लोकसभा निवडणूक पार पडली. यामध्ये राज्यात अनेक ठिकाणी धक्कादायक निकाल लागले आहेत. या निवडणुका होताच साडेचार वर्ष शांत असलेल्या मा.आ. संगीत ठोंबरे या चांगल्याच सक्रीय झाल्या आहेत. पायाला भिंगरी बांधून केज मतदारसंघात फिरत आहेत. दररोज एका गावात जाऊन प्रमुख कार्यकर्त्यांसह सामान्य नागरिकांच्या गाठीभेटी घेत आहेत. त्यामुळे त्यांना आमदारकीचे स्वप्न पडल्याची चर्चा केज मतदार संघात सुरू झाली आहे.

## छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त

# गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सन्मान सोहळ्यास उपस्थित रहावे

बीड : (प्रतिनिधी)

भारतीय बौद्ध महासभा बीड शहर शाखेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त बुधवार दि २६ जुन २०२४ रोजी विविध सामाजिक उपक्रमा बरोबर व्याख्या, इयत्ता दहावी-बारावी मध्ये गुणवंत यादी मध्ये आलेल्या विद्यार्थी -विद्यार्थीनी यांचा गुणगौरव सन्मान सोहळा आयोजित केला आहे तरी या सन्मान सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा बीड शहर शाखेच्या वतीने करण्यात आले आहे. बुधवार दि.२६ जुन २०२४ रोजी सायंकाळी ५:०० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे प्रा.डॉ.आनंद वाघ (छत्रपती



संभाजीनगर) यांचे व्याख्यान ठेवण्यात आले असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष आयु.यशवंत कदम भारतीय बौद्ध महासभा बीड तालुकाध्यक्ष हे भुषवणार आहेत तर यावेळी दहावी-बारावी मध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी - विद्यार्थिनी यांचा गुणगौरव सन्मान करण्यात येणार आहे, हा कार्यक्रम मा.आर.एम. शिंदे साहेब (सहाय्यक समाजकल्याण आयुक्त बीड) मा. सुहास हजारे (तहसीलदार बीड) मा. नानाभाऊ हजारे (उपशिक्षणाधिकारी बीड) मा.एस.एम. साळवे (जिल्हा कृषी अधिकारी) मा. महालिंग निकाळजे (भा.बी. महासभा. जिल्हाध्यक्ष (प) मा. अमरसिंह ढाका (भा.बी. महासभा कोषाध्यक्ष (प) मा. संघर्ष गोरे (बीड पोलीस) यांच्या प्रमुख उपस्थिती आयोजीत केला आहे या कार्यक्रमासाठी दहावी बारावीतील गुणवंत विध्यार्थी -विद्यार्थींनी सह पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा बीड शहराध्यक्ष ड.केतन गायकवाड,संतोष जोगदंड,संदेश डोळस, दिपक कांबळे, अमोल वडमारे, गौतम कांबळे, नितीन प्रधान, ड.सदानंद वाघमारे, सुयोग ओव्हाळ , अजय बाळशंकर, ड. तेजेस वडमारे, सिध्दांत वडमारे,नितीन मुजमुले,संजय सिस्सट, रोहन ससाणे,उमेश डोळस,किशोर वडमारे गणेश शिंदे,सचिन पवार, राजेश मस्के राहुल जावळे, गौतम खेमाडे, गौतम सोनवणे, जितु धन्ये, महादेव शिंदे आदिंनी केले आहे.

# जे शेतकरी गट अथवा कंपन्या या यंत्राचा अनुदानावर लाभ घेऊ इच्छितात

## त्यांनी त्यांचे अर्ज महाडीबीटी प्रणालीवर करावेत - कृषी विभाग

बीड /प्रतिनिधी

तालुका बीज गुणन तथा अनविक्षा व प्रात्यक्षिक प्रक्षेत्र बिंदुसरा तालुका बीड या कृषी विभागाच्या प्रक्षेत्रावर सोयाबीन बीजोत्पादन कार्यक्रम इक्ऱ तंत्राने पेरणी करून हाती घेण्यात आला. सदर प्रक्षत्राची पाहणी कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली. त्यात बाबासाहेब जेजुरकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सायप्पा गरांडे कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद गणेश वाघ तंत्र अधिकारी हर्षवर्धन खेडकर तंत्र अधिकारी यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले.

त्यावेळी प्रक्षेत्राच्या प्रमुख श्रीमती जाधव, नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे कृषी विशेषण दादासाहेब जळक कृषी पर्यवेक्षक संदीप पाटील कृषी सहाय्यक रमेश मंत्री श्रीमती सोनवणे डॉक्टर जोशी, तांत्रिक सहाय्यक राऊत सय्यद नुमान व कृषी विभागाचे



जिल्हा कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सोबतच नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातील विविध विशेषज्ञ वब जिल्हा भरातील समूह सहाय्यक हजर होते. बीबीएफ (लीरव लरीशव र्षीीूा) तंत्रज्ञानाचा वापर करून पेरणी केल्यास कमी पावसात पीक तग धरते तर अधिक पावसात /अतिवृष्टी चरावाटे पाण्याचा निचरा करण्याची सुविधा निर्माण झाल्याने पिकांचे होणारे नुकसान टळते. याशिवाय पिकाचे निरीक्षण करणे व फवारणी करणे सुलभ होते. त्यामुळे कीड रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. उत्पादन खर्च कमी होतो. याशिवाय पिकाची उत्पादकता वाढते असे शास्त्रीय निष्कर्ष आहेत. नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व नियमित विस्तार कार्यक्रमातून बीबीएफ द्वारे पेरणी करण्याबाबत गत तीन वर्षापासून शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या विविध प्रक्षेत्रावर भेटी घडवून आणण्यात येत आल्या. जिल्हा मासिक चर्चासत्रात अशा विविध प्लॉटला भेटी देण्यात येतात. त्याद्वारे प्रचार प्रसार करण्यात येतो. तरी सोयाबीन सारख्या पिकांची पेरणी बीबीएफ तंत्रज्ञानाचा वापर करून करावी असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. इक्ऱ पेरणीसाठी वापरण्यात येणारे ट्रॅक्टरचलित ललष यंत्र हे महाडीबीटी व नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प या योजनातून व्यक्तिगत शेतकरी शेतकरी गट शेतकरी कंपन्या यांना अनुदानातून पुरवण्यात आलेले आहेत. जे शेतकरी गट अथवा कंपन्या या यंत्राचा अनुदानावर लाभ घेऊ इच्छितात,

# महाविकास आघाडीची गांधीगिरी ; अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला घातला फुलांचा हार

## महावितरणने कारभार सुधारावा अन्यथा आंदोलन करणार - राजेसाहेब देशमुख

## महावितरणच्या अनागोंदी कारभाराला जनता वैतागली - माजी आमदार पृथ्विराज साठे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील महावितरण कार्यालयातील कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून महाविकास आघाडीसह शेतकऱ्यांनी गांधीगिरी करीत अनोखे निषेध आंदोलन केले. तालुक्यातील शेतकरी मागील अनेक दिवसांपासून महावितरणच्या ढिसाळ नियोजनाने, दप्तर दिरंगाई, मनमानी कारभारामुळे तसेच जळालेली विद्युत जनित्रे वेळेत न बसविल्याने, उपलब्ध करून न दिल्याने वैतागले आहेत. या कार्यालयातील अधिकारी नेहमीप्रमाणेच आढळून न आल्याने महाविकास आघाडीच्या नेते, पदाधिकारी व शेतकऱ्यांनी मंगळवार, दिनांक २५ जुन रोजी गांधीगिरी करीत कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला फुलांचा हार घालून अनोखे आंदोलन केले. यावेळी बोलताना महावितरणने तात्काळ कारभार सुधारावा, शेतकरी आणि इतर सर्व वीज ग्राहकांना दर्जेदार सेवा द्यावी अन्यथा जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आंदोलन करणार असल्याचा इशारा बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी दिला. तर महावितरणच्या अनागोंदी कारभाराला जनता वैतागली असल्याचे माजी आमदार पृथ्विराज साठे यांनी सांगितले.

महावितरण कार्यालयातील कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून अनोखे गांधीगिरी आंदोलन का करावे लागले याविषयी अधिक माहिती देताना बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, महावितरण कंपनीच्या कार्यालयात अधिकारी उपलब्ध होत नाहीत, ज्यांच्याकडे वशिला त्याला डिपी मिळतो. गरजू, गोरगरीब शेतकऱ्यांना डिपी सहज मिळत नाही. तसेच नादुरूस्त डिपी आणणे व दुरूस्त झाल्यावर परत पोहोचविणे हे महावितरणचे काम असताना तसे न करता महावितरणचे अधिकारी शेतकऱ्यांनाच हे काम स्वखर्चाने करावयास लावतात. अशा अनेक तक्रारी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आमच्याकडे



केल्या आहेत. जनता महावितरणच्या दप्तर दिरंगाई व अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला वैतागली आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाची हेळसांड होऊ नये, म्हणून महाविकास आघाडीच्या वतीने आज कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून हे प्रातिनिधिक स्वरूपात आंदोलन केले आहे. परंतु, यापुढे ही जाणिवपूर्वक हालगर्जीपणा करून जनतेला त्रास दिला. तर महावितरण कंपनीच्या कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी दिला. या बाबत बोलताना माजी आमदार पृथ्विराज साठे यांनी सांगितले की, एकिकडे अंबाजोगाई तालुक्यातील अनेक गावच्या शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरेशी वीज उपलब्ध होत नाही. तर दुसरीकडे मात्र जबाबदार अधिकारी हे कार्यालयातच उपस्थित नसतात. यावर्षी शेतातील उभी पिके जळताना बघण्याची वाईट स्थिती उद्भवली. महावितरणच्या भोंगळ व अनागोंदी कारभाराला जनता आता खूप वैतागलेली आहे. कारभार सुधारा, पारदर्शक ठेवा अन्यथा महावितरण कंपनीच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरेल असे माजी आमदार पृथ्विराज साठे यांनी सांगितले. तालुकाध्यक्ष अमर देशमुख म्हणाले की, विद्युत जनित्र मंजूर असूनही ते वेळेवर बसविले जात नाहीत, ते तातडीने बसवावेत. महावितरणच्या भोंगळ कारभाराला शेतकरी वैतागले आहेत. मंगळवारी आम्ही शेतकऱ्यांसह महावितरणच्या कार्यालयातील कार्यकारी अभियंत्याच्या कानावर हे गाऱ्हाणे घालण्यासाठी आलो असता, या ठिकाणी कोणीही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांसह आम्ही सुमारे एक ते दीड तास वाट बघून कोणीच आपली दाद-दखल घेत नाहीत. या कारणास्तव गांधीगिरी करीत कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला फुलांचा हार घालून अनोख्या पद्धतीने आपला निषेध व्यक्त केला आहे. याप्रश्नी लवकरच मोठे आंदोलन केले जाईल.

# छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीर व समुपदेशन मेळाव्याचे आ.पवारांच्या हास्ते उद्घाटन संपन्न

गेवराई ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांनी आपले करिअर कसे घडवावे यासाठी महायुती सरकारकडून कौशल्य विकास रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या खात्या कडुन सुशिक्षित बेरोजगार युवकांना कौशल्य विकास रोजगार योजनेंतर्गत मार्गदर्शन करण्यात येत असते त्या अनुषंगानेच आज दिनांक २५ जून २०२४ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था गेवराई या संस्थेतर्फे छत्रपती शाहू महाराज युवा करियर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन गेवराई मतदार संघाचे आमदार लक्ष्मण पवार यांच्या हास्ते संपन्न झाले आहे यावेळी तहसीलदार संदीप खोमणे,प्रचार्य शिवाजी बनगे, डॉ.अनिल जाधव,अकुश शिदे,राहुल नावंदर,रामदासी पवन, ना. मंगलप्रभात लोढा यांचे पि.ए.जोशी, मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, कोकाटे एम.डी,पोपळे एम.एल.,कानाडे ए.जी.,नाटकर ऐ.आर.,राऊत एस.पी.,शेख ए.एच.,आदे जी.जी.,वाघमारे जी.आर.,आतकरे एस.एल.विटकर एम.सी.,शिदे एन.एन.शेख अरशद,शेख इरफान, इंगोले,वाव्हळ,मुळे,पटवी,जाधव, आदी उपस्थित होते

या कार्यक्रमास गेवराई येथील व परिसरातील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी व सुशिक्षित बेरोजगार मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमांमध्ये युवकांना व युवतींना आपले करिअर कसे घडवावे करिअरची निवड कशी करावी मुलाखत तंत्र कलात कल चाचणी व व्यक्तिमत्व विकास कशाप्रकारे साध्य करावा याविषयी तज्ञ मार्गदर्शक यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी गेवराई येथील तहसील कार्याचे तहसीलदार व इतर प्रतिष्ठित व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते



हा कार्यक्रम आयोजित करण्यामागे असलेली शासनाची भूमिका याविषयी संस्थेचे प्राचार्य श्री शिवाजी बनगे प्राचार्य शासकीय आयटीआय गेवराई यांनी उपस्थित युवक युती यांना मार्गदर्शन केले हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था गेवराई या संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध प्रयत्न करून मेहनत घेतली व कार्यक्रम यशस्वी केला

# मी बजरंग सत्वशीला मनोहर सोनवणे परमेश्वरास स्मरून शपथ घेतो की...

## लोकसभा सदस्य म्हणून घेतली शेतकरी पुत्राने शपथ !

केज ।प्रतिनिधी

लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांनी आज ११:४७ वाजता लोकसभेचा सदस्य म्हणून शपथ घेतली यावेळी त्यांनी शपथ घेताना आईच्या नावा सह मी बजरंग सत्वशीला मनोहर सोनवणे असा नामोल्लेख केला. तर शेवटी जय शिवराय, जय किसान, जय महाराष्ट्र अशी घोषणा दिली. शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांनी भाजपाचा बालेकिल्ला भेदून खासदार म्हणून विजय खेचून आणला. यानंतर हारतुरे स्विकारण्यात वेळ न घालवता प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. जनसामान्यांचे संबंधित आरोग्य, रस्ते यासह विविध आढावा बैठकी घेतल्या असून, संबंधितांना योग्य सूचना दिल्या आहेत. लोकसभा सदस्य म्हणून आज बजरंग सोनवणे शपथविधी यासाठी ते कालच दिल्लीला पोहोचले होते. आज मंगळवार (दि.२५) सकाळी ११:४७ वाजता लोकसभा सदस्य म्हणून शपथ घेतली आहे. यावेळी त्यांनी महाराष्ट्र शासनाने नावापुढे आईचे नाव लावण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा आदर करत मी बजरंग सत्वशीला मनोहर



सोनवणे असा नामोल्लेख करत, परमेश्वराला स्मरुन मराठीतून शपथ घेतली. शेवटी जय शिवराय, जय किसान, जय महाराष्ट्र दिली. शपथविधी नंतर आपणा सर्वांच्या आशीर्वादाने बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून निवड झाली. आज तो महत्वाचा क्षण आला ! मी खासदार म्हणून शपथ घेतली. ती घेताना तुम्हा बीड जिल्ह्यातील सर्वांची आठवण मनात होती. इथली माती माझ्या स्मृतीत होती. तुम्हा सर्वांना आणि त्या मातृभूमीला स्मरून ही शपथ घेतली. श्वासात श्वास आहे तोपर्यंत तुमच्यासाठी लढत राहील. तुमच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करीन. माझ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना, कष्टकरी, गोरगरीब, कामगारांना, महिला, युवांना आजची ही शपथ अर्पण करतो. अशी सोशल मीडियावर पोस्ट करुन बीड जिल्ह्यातील जनतेला शपथ अर्पण केली.

# अंबाजोगाईत सिग्नल व्यवस्था कार्यन्वित करा - नागरिकांची मागणी

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

**अंबाजोगाई हे शहर जिल्हा स्तरावरील महत्वाचे शहर असून या शहरात जिल्ह्यासाठीची सर्व विभागाची विविध कार्यालय महाविद्यालय, विद्यालय व सांस्कृतिक केंद्र,शिक्षणस्तर उंचावलेले ख्याती प्राप्त शहर आहे त्यामुळे इतर ठिकाणच्या असंख्य नागरिकांची कोणत्या न कोणत्या कामासाठी आणि विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी ये - जा असते कायम शहरात असते.शहराची कायदा सुव्यवस्था देखील अपुरी असून पोलीस प्रशासनाचे दोन पोलीस ठाणे तर दोन अधिकारी**



**कार्यालय आहेत. शहराची संख्या लाखाच्या पुढे गेलीआहे**

शहरातील स्वा.रा.ती. शासकीय रुग्णालय ते भगवानबाबा चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते यशवंतराव चव्हाण चौक रस्त्यावर विविध शासकीय कार्यालय, शैक्षणिक संस्था व व्यापारी संकूल आहेत. मागे विवादात्मक विविध घटना घडलेल्या आहेत. वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी सध्या सिग्नल व्यवस्था कार्यन्वित करणे गरजेचे आहे.तसेच ज्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आहेत ते अपडेट करून ज्या भागात कॅमेरे नाहीत त्या ठिकाणी बसवावेत अशी नागरिकांतून मागणी केली जात आहे.

शहरात विवादात्मक व अप्रिय घटना घडू नयेत म्हणून कॅमेरे आणि सिग्नल या दोन्ही गोष्टी गरजेच्या आहेत त्यासाठी प्रशासनाने या बाबींची पुर्तता करावी म्हणजे शहरातील संभाव्य अप्रिय घटनेला आळा बसेल

शाम सरवदे, सामाजिक कार्यकर्ते, अंबाजोगाई

# विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनात १५ आरोग्यदायी पदार्थांचा समावेश फक्त कागदावरच

## मोफत गणवेश मिळणार कधी ?! गोकुळ सानप,रायमोहाकर

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या १५ पाककृती निश्चित करण्यात आल्या असुन ३ संरचित आहार पद्धती नुसार व्हेजिटेबल पुलाव, नाचणी सत्त्व,अंडा पुलाव,तांदळाची खिचडी अशा पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची खिचडीपासुन सुटका होणार असुन निश्चित केलेल्या पाककृती मध्ये व्हेजिटेबल पुलाव,अंडा पुलाव,मसाले भात,मोड आलेली मटकीची उसळ, मटार पुलाव,गोड खिचडी,मुगडाळ, खिचडी, चवळी खिचडी,मुग,शेवगा,वरण भात,तांदळाची खीर,चणा पुलाव, नाचणीचे सत्त्व, सोयाबीन पुलाव,मोड आलेले कडधान्य आदी.१५ पदार्थांचा आस्वाद घेता येणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे मात्र वस्तुस्थिती वेगळीच असुन सद्यस्थितीत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीच्या स्वरूपात पोषण आहार दिला जात आहे. शालेय पोषण आहार पुरवठादार महाग वस्तुंची कमतरता दाखवून स्वस्त असणा-या मटकी, हरभरा,वाटाणा, मसुर,मुगदाळ यांचाच शाळांना पुरवठा करण्यात येत आहे.केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारामध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करून आहाराचा दर्जा आणि पौष्टिकता वाढविणे, आहारात वैविध्य आणण्यासाठी पाककृती सुधारणा समिती नियुक्त करण्यात आली होती.

शिक्षण विभागाकडून पात्र शाळांमध्ये निर्माण केल्या जात असलेल्या परसबागातुन उत्पादीत भाजीपाला,फळे यांचा समावेश विद्यार्थ्यांच्या आहारात होत असल्याने विद्यार्थ्यांना ताजा,सकस आहार मिळण्यास मदत होत असल्याचे नमूद केले आहे. मात्र जिल्ह्यातील किती शाळांमध्ये परसबाग आहे आणि मुख्य म्हणजे उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना प्यायला पाणी नाही आणि परसबाग कशी जगवायची असा प्रश्न शाळेतील शिक्षकांनी उपस्थित केला असुन केवळ कागदावर छान असणारी योजना वास्तवात मात्र उतरताना दिसत नाही.

राज्यात एक राज्य एक गणवेश योजनेची अंमलबजावणी २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येत असून या अंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन यामध्ये एक नियमित स्वरुपाचा गणवेश तर स्काऊट व गाईड या विषयासाठी दुसरा गणवेश असणार आहे.महिला आर्थिक विकास महामंडळाकडून गणवेशाच्या शिलाईचे काम सुरू असुन लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येत असली तरी नेमका गणवेश मिळणार कधी?? हा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे.गणवेशा बरोबरच मुलांना बुट आणि सॉक्स सुद्धा मिळाले नाहीत.गतवर्षी एका विद्यार्थ्यांसाठी एक बुट जोडी आणि दोन सॉक्स जोड यासाठी १७० रूपये निधी देण्यात आला होता.यावरुन कोणत्या दर्जाचे साहित्य मिळत असेल याची कल्पनाच न केलेली बरी.

# केजमध्ये आता कुणीही उठल की सुटलं शाळा सुरु करायल !

## केजमध्ये इंग्रजी शाळा झाल्यात कोंबड्यांचे खुराडे

केज ।प्रतिनिधी

केजमध्ये खासगी इंग्रजी शाळांचे अक्षरशः पेव फुटले आहे. प्रत्येक वर्षाला इंग्रजी शाळांची संख्या झपाट्याने वाढत आहे तर दुसरीकडे या शाळांवर कोणाचेच नियंत्रण नसल्याचे दिसत आहे. शासनाचे कुठलेच नियम या शाळांकडून पाळले जात नाहीत. कोणी शेडमध्ये शाळा भरवीत तर कोणी सरळ मंगल कार्यालयातच शाळा थाटत आहे. या इंग्रजी संस्था चालकांनी शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात अक्षरशः धंदा मांडला आहे. सगळे नियम तोडले जात असताना केजचा शिक्षण विभाग मात्र उघड्या डोळ्याने झोपा काढताना दिसत आहे. इंग्रजी शाळांचे फंड समाजामध्ये एवढे वाढले आहे की, प्रत्येकाला आपला पाल्य इंग्रजी माध्यमातूनच शिकवावा असे वाटते. समाजमनाच्या या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी इंग्रजी संस्थाचालक कसाया सारखे आता पुढे आले आहेत. जागोजागी इंग्रजी शाळा उघडण्यात आल्या असून दरवर्षी यामध्ये वाढ होत आहे. या इंग्रजी शाळा कोणत्याही प्रकारचे नियम पाळताना दिसत नाहीत. शासनाने शिक्षणाच्या बाबतीत विद्यार्थ्यांना सुविधा देण्यासाठी संस्था चालकांना काही नियम घालून दिलेले आहेत. शासकीय नियमाप्रमाणे सुसज्ज आणि पुरेशी जागा असलेली इमारत आवश्यक आहे. याशिवाय वर्ग खोल्या २० बाय २० ची असावी तसेच या वर्ग खोलीला तीन खिडक्या अन् एक दरवाजा आवश्यक आहे. फरशी पासून छताची उंची १० फूट असणं आवश्यक असून असे लांबी लांबी रुंदीच्या असाव्यात याही बाबत नियम आहे. मुला मुलींसाठी वेगवेगळे शौचालय, खेळण्यासाठी मैदान, स्वतंत्र लायब्ररी, प्रयोगशाळा, स्टडी रूम अशा शासनाच्या नियमानुसार सगळ्या सुविधा करणे क्रमप्राप्त आहे. मात्र थोड्याबहुत शाळा सोडल्या तर बाकीच्या शाळांमध्ये असे कुठलेच नियम पाळले जात नाहीत. अनेक शाळांना स्वतःची किंवा सुसज्ज अशी इमारत नाही, शाळेला ग्राउंड नाही, एकाच खोलीमध्ये दोन दोन वर्गाचे विद्यार्थी बसवले जातात. काही शाळा तर अक्षरशः शेडमध्ये भरविल्या जातात तर काहीजणांनी मंगल कार्यालयातच शाळा थाटल्या आहेत. निवासी इमारतीमध्येसुद्धा शाळा भरविल्या जात आहेत. अनेकांकडे प्रशिक्षित स्टाफ नाही. असे असतानाही पालकांकडून भरमसाठ फी घेतली जाते. शाळेची फी किती असावी याबाबत शासनाने नियम घालून दिले आहेत. यासाठी पालक समिती स्थापन करून त्या पालक समितीच्या शिफारशीनुसारच फी आकारली जावी असे सांगण्यात आले आहे. मात्र अनेक ठिकाणी पालक समितीच स्थापन झालेली नाही. संस्थाचालकाने मनमानी बाटेल तेवढी फी आकारली आहे. याशिवाय आम्ही सांगू त्याच ठिकाणाहून शालेय साहित्य खरेदी करा असा दंडक घातला जातो आहे. गरज नसताना विविध शालेय साहित्य विद्यार्थ्यांच्या माथी मारले जात आहे. आरटीई प्रवेशाच्या बाबतीत नियम पाळला जात नाही. आमच्याकडे प्रवेश पूर्ण झाले असे सरळ सांगून अशा विद्यार्थ्यांला टाळले जात आहेत. असा सगळा शिक्षणाचा बाजार मांडला जात असताना जिल्ह्याचा शिक्षण विभाग काय करतो असा प्रश्न उपस्थित होतो आहे. ज्या शाळा नियमबाह्य आहेत, शासनाचे निकष पाळत नाहीत त्या शाळावर शिक्षण विभाग काही कारवाई करणार आहे का ? मुळात शिक्षणाधिकारी हेच याबाबतीत उदासीन असल्याने सर्व काही अलबेल सुरु आहे. सध्या शिक्षण विभागाने अशा शाळांची तपासणी करून, त्यांच्यावर सक्त कारवाई करण्याची गरज आहे. मात्र अशा शाळांशी हात मिळवणी करण्यातच शिक्षण विभाग धन्यता मानित असेल तर हा शिक्षणाच्या पवित्र क्षेत्राला काळीमा फासण्याचा प्रकार आहे. काही आरटीई कार्यकर्ते शासनाच्या नियमानुसार प्रवेश होण्यासाठी धडपडत आहेत. त्यांच्या प्रयत्नातून गोरगरिबाच्या मुलांना प्रवेशही मिळत आहे. मात्र शाळांच्या इतर सुविधा कोण तपासणार आहे? विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला म्हणजे चांगले शिक्षण मिळतेच असे नाही यासाठी त्या शाळेची परिस्थिती, विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या सर्व प्रकारच्या सुविधा कशा आहेत यावरच शिक्षण अवलंबून आहे. याकडे लक्ष देऊन अशा शाळांची यादी तयार करून शिक्षण विभागाने त्या शाळावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी शिक्षण प्रेमीतून होत आहे.




# बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत तुकाराम महाराज यांना धमकी, पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना निवेदन



लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या नावाने फेक अकाऊंट काढुन राजकीय सुडबुद्धीने प्रेरीत होऊन सोशल मिडीयावर बदनामी करत समाजामध्ये तेढ निर्माण करत बेलेश्वर संस्थान व मठाधिपती यांची षडयंत्र रचुन जाणिवपूर्वक बदनामी करणारे तसेच महंत तुकाराम महाराज यांना फोनवरून शिविगाळ करून धमकावणा-यांना तातडीने अटक करण्यात यावी सखोल चौकशी करून तातडीने अटक करण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे महंत तुकाराम भारती महाराज, डॉ.गणेश ढवळे, बाळकृष्ण थोरात,बाळासाहेब मोरे अंजनवतीकर, विक्रांत वाणी, संतोष वाणी,बाळासाहेब वायभट यांनी पोलिस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर यांना केली आहे.

संबंधित प्रकरणात बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत तुकाराम भारती महाराज यांनी नेकनुर पोलिस स्टेशनमध्ये लेखी तक्रार दाखल केली असुन माझ्या नावाने व डीपीवर फोटो वापरून एका व्हाट्सअप ग्रुपमध्ये आक्षेपार्ह चटींग करत बेलेश्वर संस्थान व महाराज यांच्या बाबतीत दिशाभूल करत बदनामी करण्याचा प्रयत्न असुन त्या आधारे काही जणांनी फोनवरून त्यांनी अर्वाच्य शिविगाळ व धमक्या दिल्याचे तक्रारीत म्हटले असुन त्यांच्या फिर्यादीवरून नेकनुर पोलिस स्टेशनमध्ये काल दि.२४ रोजी एनसीआर २८७/२०२४ दाखल करण्यात आली असुन सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

बेलेश्वर संस्थान आणि महंत तुकाराम भारती महाराज यांच्या बद्दल राजकीय हेतूने प्रेरित होउन सोशल मिडियावर बदनामी करणा-या व महाराजांना शिविगाळ करणा-या व धमक्या देणा-यांना तातडीने अटक करून कायदेशीर कारवाई न केल्यास पंचक्रोशीतील भाविक रास्तारोको आंदोलन करण्याच्या पावित्र्यात आहेत.

# सातबारा,फेरफार सर्व्हरमुळे शेतकरी त्रस्त सर्व्हर प्रॉब्लेम दुर करण्याची तलाठी संघटनेची मागणी

माजलगाव ।प्रतिनिधी

खरीप हंगाम सुरु झाल्यानंतर शेतकरी पीक कर्ज व पीक विमा व इतर कामासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सातबारा,फेरफार नक्कलची गरज भासते.परंतु सदर महिनाभरात वारंवार सातबारा,फेरफार सर्व्हर कधी स्लो तर कधी बंद असल्याने शेतकरी वर्गाची कामे खोळंबत आहेत.सदर सर्व्हर प्रॉब्लेम लवकरात लवकर दुर करून सर्व्हर स्पीड पूर्ववत करून देण्याची मागणी तलाठी संघटनेच्या वतीने माजलगाव तहसीलदार मार्फत शासनाकडे केली आहे.

यासंदर्भात तलाठी संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना दि २५ जुन मंगळवार रोजी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,खरीप हंगाम सुरु झाल्यानंतर शेतकरी पीक कर्ज व पीक विमा व इतर कामासाठी शेतकऱ्यांना मोठ्या



प्रमाणावर सातबारा,फेरफार नक्कलची गरज भासते.परंतु सदर महिनाभरात वारंवार सातबारा,फेरफार सर्व्हर कधी स्लो तर कधी बंद असल्याने शेतकरी वर्गाची कामे खोळंबत आहेत.सदर सर्व्हर प्रॉब्लेम लवकरात लवकर दुर करून सर्व्हर स्पीड पूर्ववत करून देण्याची मागणी तलाठी संघटनेच्या वतीने माजलगाव तहसीलदार मार्फत शासनाकडे केली आहे.सातबारा,फेरफार सर्व्हर व्यवस्थित चालले तर शेतकऱ्यांची कामे योग्य वेळेत होतील. त्यामुळे शासनाने सर्व्हर, वेबसाईटची समस्या लवकरात लवकर दुर करून शेतकरी वर्गास दिलासा द्यावा अशी मागणी शेतकरी वर्गातूनही होत आहे.




**आष्टी ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील गंगादेवी येथे छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालय आष्टी येथील चतुर्थ वर्षातील कृषी दुतांचे आगमन झाले यावेळी कृषीदूत अभिजीत गावडे सुजल गरुड अभिषेक भवर अरबाज सय्यद ऋषिकेश चव्हाण सिद्धार्थ गरुड कैलास माने सह गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी गावचे सरपंच विठ्ठल नागरगोजे म्हणाले की या कृषी दुतामुळे शेतकऱ्यांना शेती विषयी माहिती मिळते शेती कशी करावी त्यासाठी काय मशागत करावी लागते असे मार्गदर्शन मिळत असे ते आपल्या भाषणात बोलली यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य अडसूळ सर प्राध्यापक तांबोळी सर्व ग्रामस्थ उपस्थित होते**

# अखेर प्रश्न मार्गी लागणार

## दोन स्लिप रोड व दोन भुयारी मार्ग होणार



केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्या भेटीत माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांची मागणी

बीड/प्रतिनिधी

केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची नवी दिल्ली येथे नुकतीच भेट घेऊन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दोन स्लिप रोड यात बीड ते म्हाळस जवळा रस्त्यावर स्लिप रोड व बीड परळी रस्त्यावर स्लिप रोड आणि दोन भुयारी मार्ग यात आंनदवाडी फाटा व समनापूर चौक असे दोन भुयारी मार्ग करण्यात यावेत अशी मागणी केली या मागणीला मंत्रिमहोदयांनी सकारात्मकता दर्शवली असून डीपीआर मिळताच अंतिम मान्यता देऊ असे आश्वासन दिले आहे तर बीड पिंपळनेर मार्गाला राष्ट्रीय मार्गाचा दर्जा देण्याबाबत सरकार विचाराधीन असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले

संभाजीनगर ते येडशी महामार्गावर स्लीप रोड व्हावेत यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा पाठपुरावा सुरू आहे तसेच बीड कडे येताना आनंदवाडी जवळ आणि समनापूर चौक येथे भुयारी मार्ग व्हावा यासाठी देखील पाठपुरावा सुरू होता, संभाजीनगर ते येडशी मार्गावर समनापुर चौक या ठिकाणी भुयारी मार्ग होणे अत्यंत गरजेचे असून बार्शी लातूर कडून येणारी वाहने बीडमध्ये येताना आणि जाताना अडचण निर्माण होते यामुळे अनेक अपघातही होत आहे तसेच संभाजीनगर कडून बीडमध्ये येत असताना आनंदवाडी या ठिकाणी भुयारी मार्ग होणे तितकेच महत्त्वाचे झाले आहे या मार्गावर आत्तापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला असून बीड शहरातून बाहेर जाणारी वाहनांची संख्या अधिक झाली आहे सध्या जिरेवाडी फाटा येथून शहरात येणारी जाणारी वाहतूक एकाच ठिकाणाहून असल्याने वाहनधारकांना वाहतुकीच्या कोंडीला सामोरे जावे लागते त्यामुळे या दोन्ही ठिकाणी भुयारी मार्गाची नितांत गरज आहे तसेच परळी माजलगाव कडे जात असताना राष्ट्रीय महामार्गावरून समनापूर पांगर बावडी येथे स्लिप रोडची मागणी अनेक वर्षापासून आहे समनापूर जवळ हा स्लीप रोड झाल्यास राष्ट्रीय महामार्गावरून येणारी वाहने थेट परळी कडे निघू शकतात राष्ट्रीय महामार्गावरून कुर्ला म्हाळसजवळा कडे जात असताना उड्डाण पुलाजवळ स्लिप रोडची गरज आहे,या दोन्ही स्लिप रोड ला मंजुरी देण्यात यावी अशी आग्रही मागणी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन केली आहे तसेच बीड पिंपळनेर या मार्गाला राष्ट्रीय मार्गाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केल्यानंतर हा प्रश्न विचाराधीन असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे दोन स्लिप रोड आणि दोन भुयारी मार्ग हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न अखेर मार्गी लागणार असून माजी मंत्री क्षीरसागर यांच्या प्रयत्नाला यश आले आहे,दोन्ही स्लिप रोड आणि भुयारी मार्गाचा डीपीआर मिळताच यास मंजूर देऊ असेही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले आहे

## छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त,गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सन्मान सोहळ्यास उपस्थित रहावे

बीड ।प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा बीड शहर शाखेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त बुधवार दि २६ जुन २०२४ रोजी विविध सामाजिक उपक्रमा बरोबर व्याख्या, इयत्ता दहावी-बारावी मध्ये गुणवंत यादी मध्ये आलेल्या विद्यार्थी -विद्यार्थीनी यांचा गुणगौरव सन्मान सोहळा आयोजित केला आहे तरी या सन्मान सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा बीड शहर शाखेच्या वतीने करण्यात आले आहे. बुधवार दि.२६ जुन २०२४ रोजी सायंकाळी ५:०० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे प्रा.डॉ.आनंद वाघ (छत्रपती संभाजीनगर) यांचे व्याख्यान ठेवण्यात आले असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष आयु.यशवंत कदम भारतीय बौद्ध महासभा बीड तालुकाध्यक्ष हे भुषवणार आहेत तर यावेळी दहावी-बारावी मध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी - विद्यार्थिनी यांचा गुणगौरव सन्मान करण्यात येणार आहे, हा कार्यक्रम मा.आर.एम. शिंदे साहेब (सहाय्यक समाजकल्याण आयुक्त बीड) मा. सुहास हजारे (तहसीलदार बीड) मा. नानाभाऊ हजारे (उपशिक्षणाधिकारी बीड) मा.एस.एम. साळवे (जिल्हा कृषी अधिकारी) मा. महालिंग निकाळजे (भा.बी. महासभा. जिल्हाध्यक्ष (प) मा. अमरसिंह ढाका (भा.बी. महासभा कोषाध्यक्ष (प) मा. संघर्ष गोरे (बीड पोलीस) यांच्या प्रमुख उपस्थिती आयोजीत केला आहे या कार्यक्रमासाठी दहावी बारावीतील गुणवंत विध्यार्थी - विद्यार्थींनी सह पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा बीड शहराध्यक्ष ड.केतन गायकवाड,संतोष जोगदंड,संदेश डोळस, दिपक कांबळे, अमोल वडमारे, गौतम कांबळे, नितीन प्रधान, ड.सदानंद वाघमारे,



सुयोग ओव्हाळ , अजय बाळशंकर, ड. तेजेस वडमारे, सिध्दांत वडमारे,नितीन मुजमुले,संजय सिस्सट, रोहन ससाणे,उमेश डोळस,किशोर वडमारे गणेश शिंदे,सचिन पवार, राजेश मस्के राहुल जावळे, गौतम खेमाडे, गौतम सोनवणे, जितु धन्ये, महादेव शिंदे आदिंनी केले आहे.

# आरटीआयचे संकेतस्थळ खुले करा: आ.मुंदडा

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

आरटीआयचे संकेतस्थळ खुले करून विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा तिढा सोडवावा, अशी मागणी आ. नमीता मुंदडा यांनी केली आहे. राज्यात बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षण आरटीआय कायद्याअंतर्गत दुर्बल घटकातील मुलांना खाजगी शाळेमध्ये देण्यात येणाऱ्या प्रवेशाची सोडत झाली असून यादीही तयार करण्यात आली आहे. परंतु आरटीआय चे संकेतस्थळ खुले होत नसल्यामुळे विद्यार्थी व पालकवर्गासमोर पेच निर्माण झाला आहे.





त्यामुळे अर्ज करूनही काही पालक ईतर शाळामध्ये प्रवेश घेत आहेत. दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आरटीआयचे संकेतस्थळ खुले करून प्रवेश यादी प्रसिद्ध करणेबाबतची तीव्र मागणी पालकवर्गातून होत आहे. शाळा सुरु होवून बरीच दिवस झाले आहेत. अद्याप या खोजने अंतर्गत प्रवेशाची यादी प्रसिद्ध न झाल्याने पालकांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे तातडीने आरटीआयचे संकेतस्थळ खुले करून प्रवेश यादी प्रसिद्ध करून प्रवेश प्रक्रिया सुरुकरणेबाबत आदेश देण्याची मागणी आ.नमिता अक्षय मुंदडा यांनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे केली आहे.

# अंबाजोगाई येथील ऐतिहासिक स्मारकांच्या दुरूस्तीच्या कामाला मिळाला मुहर्त

## पुरातत्व विभागाने १७ कोटींच्या खर्चाला दिली प्रशासकीय मान्यता
## आ. नमिताताई मुंदडा यांच्या प्रयत्नांना यश

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील ऐतिहासिक अशा खोलेश्वर हत्तीखाना अमृतेश्वर मराठीचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी व मुळ जोगाईच्या सभामंडपासाठी पर्यटन खात्याने १६ कोटी ७८ लाख ८६ हजार रूपये खर्च मंजूर केला होता. या मंजूरीला नुकतीच प्रशासकीय मान्यता मिळाल्याने वरील ऐतिहासिकांची रूपडे पालटणार आहे. या ऐतिहासिक स्मारकांच्या दुरूस्ती व जतनासाठी केजच्या आ.सी. नमिता अक्षय मुंदडा यांनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्यामुळे या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.



मराठवाड्यातील सांस्कृतिक राजधानी म्हणून अंबाजोगाईची ओळख आहे. तसेच मराठी भाषेचे उमगस्थान म्हणून देखील बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील भाषा तज्ञांचे मत आहे. त्यामुळे अंबानगरी हे ठिकाणी मराठी भाषेची जननी म्हणून ओळखली होती. मराठी भाषेचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांनी विवेक सिंधु या ग्रंथाची रचना याच ठिकाणी शहराला ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेले आहे. ऐतिहासिक महत्व असलेल्या अंबाजोगाई येथील राज्य संरक्षित स्मारकाची दुरावस्था झाल्यामुळे शहराची

ओळख पुसली जाते की काय असा संशय व्यक्त केला जात होता. यासाठी आ.नमिता मुंदडा यांनी राज्य संरक्षीत स्मारकाच्या जनत व दुरूस्तीसाठी मागील काही वर्षापासुन शासन दरबारी पाठपुरावा करीत होत्या. त्यानूसार राज्याच्या आर्थिक बजेट मध्ये व लोकसभा निवडणूकीची अचारसंहिता लागण्यापुर्वीच सदरील कामाची निविदा काढण्यात आली. त्याला मंजूरी देत कार्यरंभ आदेश देण्यात आला. लोकसभेची आचारसंहिता संपुष्ठात आल्यानंतर या संरक्षीत स्मारकांच्या दुरूस्ती कामाला आता वेग येवू लागला आहे.

अंबाजोगाई शहरात होत असलेली ऐतिहासिक स्मारकाची कामे वेळेत पुर्ण केली जाणार आहेत. परंतु यासाठी प्रत्येक कामाला वेगवेगळा कालावधी दिला गेला आहे. कार्यरंभ आदेशाच्या पुढील १२ महिन्याच्या कालावधीत ही कामे पुर्ण होतील अशी आशा अंबाजोगाईकरांना आहे.ऐतिहासिक वास्तुची जतन करण्यासाठी व दुरूस्तीसाठी दगड, दगडी फरशी वाळु, चुना, मुरूम विटा, लाकुड व इतर आवश्यक घटक गुणवत्तापुर्वक असणारीच वापरली जाणार आहे. बांधकामासाठी

वापरण्यात येणार्या विटांचे व दगडांचे, भरीव दगडी फरशांचे नमुने तयार करून त्याची पुरातत्व खात्याकडून परवानगी घेवूनच वापरली जाणार आहेत. शहरातील ऐतिहासिक स्मारकाच्या जतन व दुरूस्ती कामातर्गत खोलेश्वर मंदिरासाठी सहा कोटी पाच लाख रूपये, जोगाई सभा मंडप, बडा हत्ती खाना च्या दुरूस्तीसाठी १ कोटी ९३ लाख रूपये, जोगाई सभा मंडप (छोटा हत्ती खाना) च्या दुरूस्तीसाठी १ कोटी ४१ लाख रूपये, अमृतेश्वर मंदिरासाठी ६ कोटी ५३ लाख रूपये आणि आद्यकवी मुकुंदराज स्वामी स्माकाच्या दुरूस्तीसाठी ८४ लाख ८३ हजार रूपये खर्च होणार आहेत. यामुळे या ऐतिहासिक स्मारकाचे नवे रूपडे साकारणार आहे. अंबाजोगाई शहर हे मराठवाड्यातील सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहराची ओळख पुसते की काय? अशी भिती व्यक्ती होवू लागली होती. या स्मारकाच्या जतनासाठी पुरातत्व विभागाच्या मार्फत रस्ता तयार करून दुरूस्ती व जतनासाठी निधी मिळून देण्यासाठी आपण प्रयत्न केला. यापुढेही शहरातील अशा वास्तुंच्या जतनासाठी प्रयत्नशील राहू.

# किल्ले धारूर च्या आरुष प्रोक्टिव्ह अबॅकस ला बेस्ट सेंटर पुरस्कार

## कू.मैथिली शशिकांत तोडकर ला मॅथ मॅजिशियन ऑफ द डे हा मानाचा अवार्ड

किल्लेधारुर ।प्रतिनिधी

किल्लेधारुर सह परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून शैक्षणिक क्षेत्रात आरुष प्रोक्टिव्ह अबॅकस क्लासेस हे नाव परिचित आहे या च परिचित असणाऱ्या क्लासेस ने काल बीड येथे झालेल्या व प्रोक्टिव्ह अबॅकस ने आयोजित केलेल्या नॅशनल समर कॉम्पिटिशन-२०२४ मध्ये किल्लेधारूर येथील आरुष प्रोक्टिव्ह अबॅकस ने बेस्ट सेंटर अवार्ड मिळवला आहे व प्रोक्टिव्ह अबॅकस नॅशनल कॉम्पिटिशन-२०२४ मधे ८०० विद्यार्थ्यां मधून ४ मिनिटात १०० गणिते सोडऊन कालचा

मॅथ-मॅजिशियन ऑफ द डे हा अवार्ड मानाचा पुरस्कार आरुष प्रोक्टिव्ह अबॅकस ची विद्यार्थिनी कु.मैथिली शशिकांत तोडकर हिने मिळवला आहे. किल्लेधारुर व आवरगाव येथे अशा दोन शाखा असणाऱ्या आरुष प्रोक्टिव्ह अबॅकस ने दोन मानाचे पुरस्कार प्राप्त केले आहेत त्यात एक बेस्ट सेंटर अवार्ड व दुसरा मॅथ मॅजिशियन ऑफ द डे हा मानाचा पुरस्कार कू.मैथिली शशिकांत तोडकर हिने मिळवला आहे त्याचबरोबर कू.समृद्धी रत्नाकर डोंगरे दुसरी क्लास मध्ये प्रथम क्रमांक,कू.स्वरा सोमनाथ राजमाने दुसरी




क्लास मधून द्वितीय क्रमांक,चि.सुदर्शन हनुमंत लांब तिसरी मधून प्रथम क्रमांक,चि.समृद्ध गोविंद सोळंके पहिली क्लास मधून दुसरा,चि.पृथ्वीराज लालासाहेब जगताप चौथी क्लास मधून दुसरा क्रमांक,कू.अस्मिता समाधान नखाते तिसरी क्लास मधून दुसरा क्रमांक कू.सानवी अशोक नखाते पहिली मधून तृतीय क्रमांक,कू.सिद्धी सुशील नखाते चौथी क्लास मधून तिसरा क्रमांक कू.स्नेहल अशोक पवार तिसरी क्लास मधून चौथा क्रमांक,कू.मयुरी नितीन पाटोळे सिनियर के.जी.मधून चौथा क्रमांक,कू.स्वरा महारुद्र इंगळे दुसरी क्लास मधून चौथा क्रमांक,चि.सोहम रमेश बांगर पाचवी क्लास मधून चौथा क्रमांक,कू.समृद्धी पुष्पराज जगताप चौथा क्रमांक,चि शार्दुल दत्तात्रय सोळंके तिसरी क्लास मधून पाचवा क्रमांक आहे अनुक्रमे क्रमांक मिळवलल्या सर्व विद्यार्थ्यांचे व प्रोऍक्टिव्ह अबॅकस समर कॉम्पिटिशन २०२४ मधे सहभागी झालेल्या आरुष प्रोक्टिव्ह अबॅकस धारूर व आवरगाव येथील सर्व विद्यार्थ्यांचे आरुष प्रोक्टिव्ह अबॅकस चे संचालक प्रा.अविनाश जगताप, संचालिका सौ.शीतल अविनाश जगताप, यांच्या सह पालकांनी व पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमीनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

# कर्नाटक येथील बैठकी दरम्यान ऊसतोड मजुरांची ३४% दर वाढ करणाऱ्या कारखाना अधिकाऱ्यांचा सत्कार

## आठ दिवसात राहिलेल्या कारखानदारांनी भाव वाढ न दिल्यास महाराष्ट्रात करारासाठी फिरू देणार नाहीत कर्नाटक राज्यातील अधिकाऱ्यांच्या बैठकीत त्यांना संघटनेचे आवाहन




धारूर ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मेन मुकादम, व ऊस वाहतूकदार यांच्या वतीने दि.२५ जून २०२४ मंगळवार रोजी सिध्दी मंगल कार्यालय खामगाव पंढरपुर महामार्गावर धारुर-तेलगांव रोड, भोगलवाडी फाटा येथे दुपारी १२ वाजता बैठकीला सुरुवात करण्यात आली. या बैठकीस सर्व कर्नाटकातील कारखान्याचे कर्मचारी अधिकारी प्रतिनिधीत्व करण्यासाठी उपस्थित होते. त्याच प्रमाणे स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब ऊसतोड मजूर संघटनेतील मुकादम हजारोच्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीदरम्यान हर्षा कारखाना व सोमेश्वर कारखाना यांनी ३४% दर वाढ जाहिर केली या चर्चा दरम्यान जाहिर करणार्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला तर काही अधिकाऱ्यांनी आम्ही कारखान्याच्या वरिष्ठांशी कारखानदारांशी बोलणी करून नक्कीच भाव वाढ जाहिर करण्यास भाग पाडू असे आश्वासन यावेळी चर्चा दरम्यान बीड जिल्ह्यातील मुकादम संघटनेशी बोलताना दिले यादरम्यान पुढील आठ दिवसात ऊसतोड कामगारांची ३४% दर वाढ न दिल्यास महाराष्ट्रात त्या कारखान्याच्या अधिकाऱ्यांना करारासाठी फिरू देणार नाहीत असे आवाहन संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी यावेळी केले.या चर्चा सत्र व बैठकी दरम्यान प्रदेश अध्यक्ष गोरख दादा रसाळ स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब ऊसतोड मजूर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष संजय भाऊ तिडके हनुमंत बप्पा नागरगोजे,तुकाराम बापू तिडके,ज्येष्ठ पत्रकार महादेव तोंडे, कृष्णा तिडके,सुखदेव सानप, यांनी मार्गदर्शन केले.या बैठकीदरम्यान बीड जिल्ह्यातून हजारो मुकादम व ऊसतोड कामगार या चर्चासत्रा मध्ये उपस्थित होते. या वेळी कारखान्याचे कर्मचारी सत्यशुगरचे शामराव बिरजे साहेब समिरवाडी कारखान्याचे ' संतोष चंदन शिव साहेब बेळगी कारखान्याचे येलोडे साहेब. यांच्या सह ईतर अधिकारी उपस्थित होते.



प्रतिनिधी । बीड

पुसरा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते विष्णूबाळ झोडगे यांचा मंगल परीनय अगदी साध्या पद्धतीने मोजे वारोळा ता माजलगाव येथे आयु साक्षी तुपारे यांच्याशी सामाजिक,राजकीय, संप्रदायिक क्षेत्रातील मान्यवर राजकीय पक्षातील नेतेमंडळी विविध संघटनेतील पदाधिकारी,डॉक्टर मित्रमंडळी सामाजिक कार्यकर्ते,युवक मित्रमंडळी उपस्थित होते विवाहानंतर वृक्ष लागवड करून वैवाहिक जीवनाची सुरुवात केल्याने.. सामाजिक संदेश देऊन विवाह पार पाडला. सामाजिक संदेशाने आणि सामाजिक उपक्रमाने केलेल्या या मंगल परीनयाचें सर्वत्र कौतुक केले जात आहे. साध्या पद्धतीने केलेल्या या मंगल परिणय मध्ये सामील झालेल्या सर्वांचे झोडगे परिवाराच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.. !




आमचे मार्गदर्शक तथा,जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद बीड मां.श्री.उल्हास जी गंडाळ साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले !!! या वेळी पत्रकार अमोल जाधव मित्र गौरव मस्के,रोहन जाधव,धनराज मस्के,या सर्वांच्या उपस्थितीमध्ये टिपलेले हे छायाचित्र.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT